# महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-३६२०/प्र.क्र.४०/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :२१.०८.२०२२

**प्रति,**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय:** भताळी ओपन कास्ट माईन या प्रकल्पाच्या विस्ताराकरीता वेस्टर्न कोलफिल्डस लि. यांना ०.२० हेक्टर झुडपी जंगल जमीन वळती करणेबाबत.

**संदर्भ:** प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे पत्र क्र. कक्ष-२३ (२)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.१५१(नोडल)/५५२/२०२२-२३, दि.२६.०५.२०२२

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर प्रकल्पासाठी प्रस्तावित ०.२ हे. झुडपी जंगल जमिनीव्यतिरिक्त सुमारे ८३७.९४ हे. वनेतर जमीन लागणार असल्याचे दिसते. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे उक्त अभिप्राय पाहता, ८३७.९४ हे. जमीन वन्यजीव भ्रमणमार्गाचा भाग आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. तरी, सदर प्रकल्पासाठी आवश्यक वनेतर जमीन वन्यजीव भ्रमणमार्गाचा भाग आहे किंवा कसे याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी शासनास अभिप्राय सादर करावेत व केंद्रस्थ अधिकारी यांनी आवश्यकतेनुसार वन्यजीव संवर्धन आराखड्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भातील प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र सादर करावे.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन